# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**( घन कचरा व्यवस्थापन आर/उत्तर विभाग )**

क्र. सहा. अभि. / घकव्य/ 1206 /आर/उत्तर दि 02.06.2026

## <u>जाहिरात</u>

**"स्वच्छ मुबई प्रबोधन अभियान"**

**स्वच्छता – मनापासुन शहरापर्यंत**

विषय:- आर/उत्तर विभागात 'स्वच्छ मुबई प्रबोधन अभियान' ( वस्ती स्वच्छता योजना ) राबविण्याबाबत.

आर/उत्तर विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरीता स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना) राबविण्याकरीता आर/उत्तरविभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत बचतगट तसेच दि. 01.07.2024 किंवा तत्पूर्वी नोंदणीकृत असणा-या इच्छुक शासन नोंदणीकृत स्थानिक मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था तसेच बचतगटकडुन संस्थामार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरीता संस्थांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरीता निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1 | " स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान"<br>(वस्ती स्वच्छता योजना ) | **34 संस्था** (**364** स्वयंसेवक) |

अर्जाचा नमुना आणि स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान बाबतची नियमावली आर/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांच्या कार्यालयात दि. **04.06.2026** ते दि. **11.06.2026** याकालावधीत, सकाळी **10.30 ते दुपारी 4.00** या वेळेत मिळु शकेल. संस्थेने आर/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. **11.06.2026** (दुपारी **4.00** वाजेपर्यंत) आहे. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत काढण्यात येइल.

सदर सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप, विभागाचे सहाय्यक आयुक्त / सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) योजनेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार करतील. तसेच सोडती मध्ये यशस्वी झालेल्या संस्थांनी घन कचरा व्यवस्थापन विभागातील अधिकारी वर्गाच्या निर्देशानुसार सकाळ व दुपार सत्रात कचराचे संकलन करणे तसेच नेमुन दिलेल्या वस्तीमध्ये कचरा वर्गीकरण करणे, नाल्यामध्ये कचरा न टाकणे वगेरे विषयावर स्थानिक लोकांमध्ये प्रबोधन व जन जागृतिकरणे करिता आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे अनिवार्य असेल.

कामाचा कालावधी दि. **01.07.2026** ते दि. **31.12.2026** या कालावधीकरिता किंवा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालया मार्फत या योजना राबविण्याबाबत निर्देश देण्यात येतील जे लवकर असेल, त्यानुसार संस्थांनी स्वच्छतेचे काम करावे लागेल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/उत्तरविभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'आर/उत्तर' विभाग**